वाचले-

१ मा.उप आयुक्त उद्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.उद्यान/७/कावि/२९४/२०२४, दिनांक २६/०३/२०२४

२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)

३ सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र.साप्रवि/९/कावि/२८७/२०२३, दि.२२/०६/२०२३

४ परिपत्रक क्र.दवनि/१/कावि/९७/२०२२, दिनांक १४/०३/२०२२

५ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १४/०६/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८,
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/३५/२०२४
दिनांक १४/०६/२०२४

विषय :- श्री.काळभोर संजय देवराम (उपलेखापाल ) यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत... (सं.क्र.५२८२)

आदेश,

श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "मदतनीस" या पदावर दिनांक ०१/१०/१९९१ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये उपलेखापाल या पदावर कार्यरत आहेत. श्री. काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांची जन्मतारीख १९/०६/१९६६ अशी असून दिनांक १८/०६/२०२४ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांना दिनांक ३०/०६/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

मा.उप आयुक्त उद्यान यांचे उपरोक्त वाचले क्र.१ चे पत्रान्वये श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी अग्रिम, घर दुरुस्ती अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम, कामगार कल्याण निधी अग्रिम, वैद्यकीय अग्रिम किंवा इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द खातेनिहाय चौकशी चालू असून श्री. काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे. श्री.काळभोर संजय देवराम यांना उपरोक्त वाचले क्र.०३ चे आदेशान्वये अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालयाने लाचलुचपत प्रकरणी सेवानिलंबित करण्यात आले होते. सदरचे प्रकरण मा.विशेष जिल्हा न्यायालय, पुणे येथे प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

सबब, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता, उपरोक्त वाचले क्र.०४ चे प्राप्त अधिकारानुसार मी उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांना दि.३०/०६/२०२४ रोजी मा.विशेष जिल्हा न्यायालय पुणे येथे दाखल लाचलुचपत प्रकरणाच्या होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व उपरोक्त वाचले क्र.०३चे खातेनिहाय चौकशीचे निर्णयाचे अधिन महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास मान्यता देत आहे. तसेच मा.विशेष जिल्हा न्यायालय, पुणे येथील वरील लाचलुचपत प्रकरणाचा अंतिम निकाल झाल्यानंतर तो सामान्य प्रशासन विभागास सादर करणेची जबाबदारी श्री. काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांची राहील.

भविष्यात लेखापरिक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांना भरणे बंधनकारक राहील. प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति - श्री. काळभोर संजय देवराम, उपलेखापाल

प्रत - लेखा विभाग

२/- श्री. काळभोर संजय देवराम, उपलेखापाल यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग    २.दूरसंचार विभाग    ३.माहिती व जनसंपर्क विभाग
४.कामगार कल्याण विभाग    ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग
६.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १४, १६, २२, संगणक कक्ष    ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था    ९. उद्यान विभाग    १०.सर्व संबंधित विभाग